**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 08/09/2020 Accepted on : 28/09/2020 Publication Date: 30/09/2020

# उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ताण या मानसिक घटकांचा होणारा परिणाम : एक अभ्यास

**सुजाता हरिभाऊ कांबळे,**
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र
Email – shkamble26@gmail.com

**सारांश:** प्रस्तुत संशोधनात उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या प्रगतीवर ताण या मानसिक घटकाचा अभ्यास केला आहे. उच्च शिक्षण घेताना महिलांना अनेक अडचणी येतात त्यातून निर्माण होणार्या कौटुंबिक समस्या त्यामध्ये त्यांचे मानसिक, भावनिक, शारीरिक आरोग्य बिघडते. विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ह्या घटकांचा परिणाम दिसून येतो. मानसिक ताण या घटकांमुळे विवाहित महिलांपुढे विविध कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण होत असतात. त्यामुळे त्या नेहमी ताण तणावाखाली असतात. त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती हि काही प्रमाणात खुंटत असते. कौटुंबिक ताण तणावामुळे वैयक्तिक विकासाबरोबरच मानसिक, शारीरिक, सामाजिक, आर्थिक कुचंबनेतून शैक्षणिक विकास साधावयाचा असेल तर खंबीरपणे स्वताच्या हिमतीवर उभे राहावे लागते. त्यामुळे उच्च शिक्षण घेताना विवाहित महिलांच्या मानसिक घटक ताण याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. सदरील संशोधन हे विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ताण या मानिसक घटकांचा कसा परिणाम होतो या विषयीचा अभ्यास केला जाणार आहे. सदरील संशोधनात नांदेड जिल्ह्यातील ५० विवाहित महिलांचा अभ्यास केला आहे. पदवी व पदव्युतर स्तरावरील उच्च महाविद्यालयातील विवाहित महिलांची नमुना निवड करण्यात आली. संशोधन विश्लेषण करण्यासाठी टी टेस्ट, झेड स्कोर चा वापर करण्यात आला आहे.

**महत्वपूर्ण शब्द:** मानसिक ताण, शिक्षणिक प्रगती, विवाहित महिला.

## १ प्रस्तावना:

आधुनिक काळात महिला शिक्षण घेनासाठी धडपडत आहेत. विवाहपूर्व काळात काही पारिवारिक अडचणीमुळे टी शिक्षण घेऊ शकली नाही तर तिचे वैवाहिक जीवन सुरु झाल्यावर अपूर्ण इच्छेची पूर्ती करण्यची तिची मनीषा असते. जेंव्हा टी आपले शिक्षण पुर्ववत सुरु करण्यासाठी सुरुवात करते त्यावेळी तिला अनेक अडचणी येतात. कारण स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने घराबाहेर पडून शिक्षण घ्यावे अशी समाजाची भावनिकता बनलेली नाही. कारण अजूनही स्त्रिया बाबतचा पारंपारिक दृष्टीकोन बदलेलेला नाही. १० वी किंवा १२ वी पर्यंतचे शिक्षण घ्यावे व विवाह करून सुखी संसार करावा अशी मानसिकता पुरुषांची असते. यातून एखाद्या वेळी महिलांची उच्च शिक्षण घेण्याबाबत मानसिकता तयार होते हि पारिवारिक आर्थिक गरजेतून, एकीकडे टू शिक असा अट्टाहास सतीच्या मागे असतो. परंतु शिक्षण घेण्यासाठी मुक्त व पोषक वातावरण त्यांनी उपलब्ध करून दिलेले नसते. उच्च शिक्षण घेणाऱ्या विध्यार्थिनी मध्ये काही विअवाहित महिला देखील आहेत. त्यांना कुटुंबातील घरगुती कार्यक्रम, सनवार, रीतीत्रीवज, रूढी परंपरा या सर्व गोष्टी सामावून घेऊन आपल्या शिक्षणिक प्रगतिकडे लक्ष ध्यावे लागते. विवाहित महिला उच्च शिक्षण घेतात परंतु काही विशिष्ट तणावामध्ये चिंतेमध्ये राहून घ्या शिक्षण घेत असतात. वरील सर्व गोष्टीचा त्यांच्या शैक्षणिक पगातीवर कशा प्रकारे परिणाम होतो याविषयी अभ्यास करणे आवश्यक आहे.

## २ समस्या विधान :

**उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ताण या मानसिक घटकांचा होणारा परिणाम – एक अभ्यास**

**संशोधन उदिष्टे :**

१. उच्च शक्षण घेणार्या विवाहित महिलांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
२. उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ताण या मानसिक घटकांचा होणार्या परिणामांचा अभ्यास करणे.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 5, Sept-Oct – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 08/09/2020 Accepted on : 28/09/2020 Publication Date: 30/09/2020

## ३ संशोधन गृहीतके / परिकल्पना :

१. उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक समस्या जाणवतात.
२. उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ताण या घटकांचा सार्थ परिणाम होतो.

## ४ संशोधन पद्धती व साधन :

१. सदरील संशोधनात प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.
२. सदरील संशोधनात पल्लवी भटनागर, anxiety **& stress scale** या प्रमाणित चाचणीचा वापर करण्यात आला आहे.

५ **संशोधनाचे विश्लेषण :** सदरील संशोधन विश्लेषण करण्यासाठी टी टेस्ट चा वापर करण्यात आला आहे.

| विवाहित महिला | नमुना निवड | पूर्व चाचणी | | उत्तर चाचणी | | टी टेस्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मध्यांक | प्रमाण विचलन | मध्यांक | प्रमाण विचलन | |
| ग्रामीण | ५० | २.३ | १.२३ | ३.३८ | १.४४ | ५.५८* |
| शहरी | ५० | २.१२ | १.३७ | ३.७४ | १.१२ | ५.११* |

६ **संशोधन परिकल्पना :** ०.०५ सार्थकता स्तरावर तपासण्यात आली आहे.

## ७ संशोधन निष्कर्ष:

- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगतीवर ताण या घाकाचा सार्थ परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात शरीरिक अवस्थेतील घटकावर सार्थ परिणाम होत आढळून आले आहे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात मानसिक अवस्थेतील घटकावर सार्थ परिणाम होत आढळून आले आहे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात वर्तन संबंधी घटकावर सार्थ परिणाम होत आढळून आले आहे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात भावनिक अवस्थेतील घटकावर सार्थ परिणाम होत आढळून आले आहे.

## ८ संशोधन शिफारशी:

- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलाना त्यांच्या ताण कमी करण्यासाठी कुटुंबातून पूर्ण स्वतंत्र द्यावे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलाना त्यांची शिक्षणिक प्रगती करण्यासाठी कुटुंब स्तरावर प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलाना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवरील परीनामासंदर्भात शारीरिक अवस्था घटकांची योग्य त्या प्रमाणात काळजी घ्यावी.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलाना वर्तन संबंधी घटकातील परिणाम संदर्भात मानसिक प्रबालन द्यावे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या विवाहित महिलाना भावनिक घटकासंदर्भात सामाजोजन साधावे.

## संदर्भ :

१. उपासनी एन. के. (१९९६). नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन पुणे.
२. दांडेकर वा. ना. (१९९४), शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र, विद्या प्रकाशन, पुणे
३. घोरमोडे के. यु. आणि घोरमोडे कलाकृष्ण, (२००८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या प्रकाशन नागपूर.
४. डॉ. वी रा भिंताडे (१९८८), शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.
५. सुभाष शर्मा (२००६), भारतीय महिलाओकी दशा, आधार प्रकाशन, पंचकुला, (हरियाना)
६. श्रोती निशिकांत (१९८४), स्त्री आणि आरोग्य स्वाती प्रकाशन, पुणे.
७. अष्टेकर शाम, (२०१३), आपले आरोग्य, नेशनल बुक टर्ष्ट ऑफ इंडिया, नवी दिल्ली.